नाशिक जिल्हा परिषद नाशिक
जा.क्र./जिपना/शिक्षण/प्रा-४/१४८१/२०१७
नाशिक दिनांक २९/ १२ /२०१७

प्रति,
मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
जिल्हा परिषद नाशिक

**विषयः- जिल्हा परिषद नाशिक वेबसाईटवर आदेश डाऊनलोड करणे बाबत**

**महोदय ,**

वरील विषयान्वये शिक्षण विभाग प्राथमिक कार्यालयाचे अधिनस्त आंतरजिल्हा बदलीने इतर जिल्हा परिषदेकडून नाशिक जिल्हा परिषदेकडे हजर झालेले श्री.साहेबराव तुकाराम वाडिले प्राथमिक शिक्षक यांना दि.२८/१२/२०१७ रोजी समुपदेशनाने सामावून घेण्यात आलेले असून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चांदोरा तालुका नांदगाव येथे पदस्थापना देण्यात आलेली आहे.

सदर आदेश जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर डाऊनलोड करणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांनी आदेशीत केलेले आहे.

कृपया सदरचे आदेश जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर सहा महिन्याच्या कालावधीसाठी प्रसिध्द करणेत यावा ही विनंती.

29.12.17

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद नाशिक.**

Scanned by CamScanner

वाचा :- 1) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाभरती) नियम 1967 मधील नियम 6(8) 6(9)

2) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, असाधारण क्रमांक.29, दिनांक 9 जून 2014

3) शासन निर्णय क्र.बीसीसी-2014/प्र.क्र.213A/14/16-ब, दि.5 मार्च 2015

4) शासन निणय क्रमांक बीसीसी-2014/प्र.क्र.213A/16-ब दि.26 जुन 2015

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग,शासन निर्णय क्र/आंजिब/-4917/प्र.क्र.-79/आस्था-14 दिनांक 24 एप्रिल 2017

6) मा.कक्ष अधिकारी, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील पत्र क्र/आंजिब/-4917/प्र.क्र.-79/आस्था-14 दिनांक 12 जून 2017

7) मा.कक्ष अधिकारी, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील पत्र क्र/आंजिब/-4917/प्र.क्र.-79/आस्था-14 दिनांक 13 जून 2017

9) मा. अवर सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचेकडील पत्र क्र/आंजिब/-4917/प्र.क्र.-79/आस्था-14 दिनांक 5 ऑगस्ट 2017

10) कार्यालयीन मंजूर टिपणी दिनांक 28/12/2017

---

**आंतर जिल्हा बदली पदस्थापना आदेश**

नाशिक जिल्हा परिषद नाशिक

जा.क्र.जिपना/शिक्षण/आंजिब/प्रा/4अ/1480/2017

नाशिक दिनांक :-28/12/2017

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाभरती) नियम 1967 चे नियम 6(8) मधील तरतूदीनुसार एक जिल्हा परिषदेमधून दुसऱ्या जिल्हा परिषदेमध्ये आंतरजिल्हा बदलीने सामावून घेणेस संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी सक्षम प्राधिकारी आहेत.

संदर्भ क्र.5 व 8 नुसार जिल्हा परिषद कर्मचा-यास आंतरजिल्हा बदलीने सामावून घेण्याबाबत मार्गदर्शक तत्वे ठरवून दिलेली आहेत. उक्त संदर्भ क्र.7 नुसार खालील प्राथमिक शिक्षक / शिक्षिका यांचे आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांची यादी प्राप्त झालेली आहे.

उपरोक्त, सेवा प्रवेश नियम तथा शासन निर्णयान्वये तथा शासन परिपत्रकान्वये खालील शिक्षकास आंतरजिल्हा बदलीने त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या प्रवर्गातून खालील अटी व शर्तीस अधिन राहून नाशिक जिल्हयातील रिक्त असलेल्या पदी सामावून घेण्यात येत आहे.

| अ.क्र. | ऑनलाईन यादीतील क्रमांक | प्राथमिक शिक्षकाचे नांव | कार्यरत जिल्हा परिषदेचे नांव | पदस्थापना दिलेल्या शाळेचे नांव | | जि.प.नाशिक येथे हजर दिनांक | जात प्रवर्ग | बदली संवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शाळा | तालुका | | | |
| 1 | 207 | श्री.साहेबराव तुकाराम वाडिले | रायगड | चोंढेरा | नांदगाव | 21/11/2017 | NTB | विशेष संवर्ग भाग-1 |

<u>अटी व शर्ती :</u>

1) आंतरजिल्हा बदलीने अन्य जिल्हा परिषदेतून सामावून घेतलेल्या कर्मचा-याची सेवाजेष्ठता अशा बदलीनंतर नाशिक जिल्हा परिषदेत हजर झाल्याच्या दिनांकानुसार निश्चित करण्यात येईल.

2) आंतरजिल्हा बदली ही विनंतीनुसार बदली असल्याने यासाठी कोणतेही भत्ते व पदग्रहण अवधी अनुज्ञेय असणार नाही.

3) पदस्थापना देण्यात आलेल्या स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील शिक्षकांचे बाबतीत त्यांना नाशिक जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रामध्येच राहणे बंधनकारक आहे. त्यांना अनुसूचित क्षेत्राबाहेर पदस्थापना किंवा अन्य कारणाने बदली अनुज्ञेय राहणार नाही. संबंधित शिक्षकांनी पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होतांना यापुढे जिल्हयातील अनुसूचित क्षेत्राबाहेर बदलीची मागणी करणार नाही असे शपथपत्र गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडे सादर करावे.

4) आरक्षित प्रवर्गातील पदस्थापना दिलेल्या शिक्षकांचे बाबतीत त्यांनी त्यांच्या जात प्रवर्गाचे जातवैधता प्रमाणपत्र संबंधित शिक्षकाने हजर झाल्यानंतर सहा महिन्याचे आत सादर करणे आवश्यक राहील. सहा महिन्याच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास सेवा समाप्त करण्यात येईल.

5) आंतरजिल्हा बदलीसाठी सादर केलेल्या अर्जातील माहिती खोटी असल्याचे तसेच अर्जासोबत दिलेल्या कागदपत्रामध्ये तफावत असल्याचे आढळून आल्यास संबंधिताविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्यात येईल व त्यांना जि.प.सेवेतून तात्काळ सेवामुक्त करण्यात येईल.

6) पदस्थापना आदेश निर्गमित झाल्यानंतर तात्काळ हजर होणे बंधनकारक आहे. अन्यथा सदरचा आदेश आपोआप रद्द समजणेत येईल.

सदर आदेशाची नोंद संबंधिताचे मूळ सेवापुस्तकात घेण्यात येऊन योग्य ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

स्वा/-

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

प्रति :- श्री.साहेबराव तुकाराम वाडिले ,प्राथमिक शिक्षक.

प्रति :- 1) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प. रायगड

2) शिक्षणाधिकारी (प्राथ.),जि.प. रायगड

प्रत :- 1) गट विकास अधिकारी (उश्रे.),पं.स. नांदगाव

2) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती नांदगाव

2/- आंतरजिल्हा बदलीने आलेले शिक्षक मूळ जिल्हापरिषदेत केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक किंवा पदवीधर शिक्षक या पदोन्नतीच्या पदावर कार्यरत असतील तर त्यांना प्राथमिक शिक्षक या पदावरच हजर करुन घ्यावे. अशा शिक्षकांचे बाबतीत त्यांची प्राथमिक शिक्षकाचे वेतनश्रेणीत वेतन निश्चिती करुन तशी नोंद पूर्वीच्या जिल्हा परिषदने त्यांच्या मूळ सेवापुस्तकात केलेली आहे याची खात्री करावी. सदरच्या वेतननिश्चितीची कार्यवाही पूर्ण केल्यानंतरच त्यांचे वेतन अदा करण्यात यावे. तसेच संबंधित शिक्षक शाळानिहाय हजर झालेबाबत हजर दिनांकासह अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत :- 1) मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जि.प.नाशिक

2) कार्यालयीन प्रत / ज्ञापन नस्ती.

3) प्राथमिक-2 संकलन,शिक्षणविभाग(प्रा),जि.प.नाशिक

28/12

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

Scanned by CamScanner